

# १६. सुगीचे दिवस

– शंकर पाटील

दिवाळी गेली. सुगीचे दिवस जवळ आले. थंडी कडाक्याची पडू लागली. या थंडीने लोकांचे ओठ फुटू लागले. टाचांना भेगा पडू लागल्या. सकाळ-संध्याकाळ जाळ करून लोक शेकत बसू लागले. थंडीचा कडाका वाढला. ज्वारीच्या कणसांत दाणा भरू लागला. टपोरी कणसे भरदार दिसू लागली. वाऱ्याबरोबर ती डुलू लागली. हुरडा सुरू झाला. आज या शेतावर तर उदया त्या शेतावर लोक हुरडा खायला जाऊ लागले.



पाखरांचे थवेच्या थवे पिकांवर येऊन बसू लागले. पाखरे येऊ नयेत म्हणून शेतांत बुजगावणी उभारली जाऊ लागली. पाखरांना हाकलण्यासाठी शेतकरी गोफणी फिरवू लागले. तोंडाने हा-हा-हा करून ओरडू लागले. याच्या जोडीला डबेही वाजू लागले. या आरडाओरडण्याने गावचे शिवार घुमू लागले. भल्या पहाटेपासूनच शेते अशी गजबजून जाऊ लागली. पाखरांचे थवे या पिकांवरून त्या पिकांवर उडू लागले.

हुरड्याचे दिवस संपत आले. ज्वारीची पाने बुडख्यापासून शेंड्यापर्यंत वाळत चालली. हिरवे शिवार पिवळे दिसू लागले.

शेतांतील भुईमुगाच्या वेलांचा रंगही बदलू लागला. त्यांची हिरवी पाने करडी दिसू लागली. शेंगांची काढणी सुरू झाली.



गावातील बायकामुले शेंगा वेचायला जाऊ लागली. रोज संध्याकाळी शेंगांनी भरलेल्या दुरड्या घरी येऊ लागल्या.

भाजलेल्या शेंगांतील तो मऊ सुरकुतलेला दाणा पुरणागत लागू लागला.

शेंगांची काढणी संपत आली आणि जोंधळ्याची कापणी सुरू झाली. ऐन सुगीची गडबड दिसू लागली. बायका-मुले, म्हातारी-कोतारी सारी याच कामात दंग होऊन गेली. गावात कोणी दिसेनासे झाले. दिवसभर घरांना कुलपे लागू लागली.

शेताशेतांतून अशी कापणी सुरू झाली. विळे लागून कोणाची बोटे कापू लागली. सड लागून कोणाच्या पायाला जखमा होऊ लागल्या. तात्पुरती चिंधी बांधून लोक तशीच कामे करत होते. कुणाची कापणी चालू होती, कुणाची खुडणी



सुरू होती. कुणी खुडलेली कणसे खळ्यात आणून टाकत होते. खळ्यातल्या तिवड्याभोवती बैल फिरत होते. त्यांच्या पायांखाली कणसे रगडली जात होती. कुणाची अशी मळणी सुरू होती, कुणी या मळलेल्या दाण्यांना वारे देत होते. कुणी हे दाणे पोत्यांत भरत होते, कुणी ही भरलेली पोती गाडीत घालून घरी नेत होते. कामांची अशी धांदल सुरू होती. सुगीशिवाय दुसरे काही सुचत नव्हते. सुगी अशी ऐन बहरात आली होती.



**सुगी** – पिकांच्या काढणीचा काळ. **शिवार** – गावाभोवतालची सीमेपर्यंतची शेत-जमीन. **सड** – कापलेल्या ज्वारीचा टोकदार बुडखा. **खळे** – धान्याची कणसे मळण्याची किंवा झोडण्याची वाटोळी जागा. **मळणी** – कणसे झोडपून किंवा जनावरांकडून तुडवून धान्य काढणे. **तिवडा** – खळ्याच्या मध्यभागी असलेला लाकडी उभा खांब किंवा मेढ.

**प्रश्न :**

१. सुगीचे दिवस जवळ आले, तेव्हा हवा कशी होती? २. पाखरांना हाकलण्यासाठी शेतकरी कायकाय करू लागले? ३. दिवसभर घरांना कुलपे का लागू लागली? ४. ऐन सुगीच्या दिवसांत एकाच वेळी कोणकोणती कामे चालू होती? ५. ज्वारीच्या कापणीपासून धान्य घरात येईपर्यंत कोणकोणत्या गोष्टी कराव्या लागतात?